वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. २० जून २०२५ पाने ४ किंमत ३

# आमिषाने ठेवी घेतल्या, परत देताना नकार

## धुनकेश्वर मल्टीपलने ठेवीदाराला १२ लाखाला फसवले

बीड (दिव्य न्युज):- ठेवीदारांना जास्त व्याजदराचे आमिष दाखवून फसवणाऱ्या मल्टीस्टेटच्या यादीत आता माजलगाव तालुक्यातील दिंद्रुडच्या धुनकेश्वर मल्टीपल बँकेचे नाव समोर आले आहे. आधीच ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, मातोश्री, जिजाऊ, छत्रपती या मल्टीस्टेट वाल्यांना ठेवीदारांचे कोट्यावधी रूपये बुडवलेले आहेत. त्यातच आता धुनकेश्वर मल्टीपलची ही भर पडली आहे. तब्बल १२ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी बँकेचे अध्यक्ष शिवहरी यादव, उपाध्यक्ष सचिन रोडगे, सचिव रामेश्वर तांदळे यांच्यासह पाच जणांविरूध्द दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. माजलगाव येथील धुनकेश्वर मल्टीपल निधीच्या दिंद्रुड शाखेत अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतरांनी ठेवीदारांना १२.५ टक्के व्याजदराचे आमिष दाखवून मोठ्या स्वरूपातील ठेवी शाखेत जमा करून घेतल्या. बनावट ठेव पावत्या (बॉन्ड) ठेवल्या असल्याचे भासवून त्यावर बँकेचे सही, शिक्के करून ठेवीदारांना दिले. ठेवीचा कालावधी संपल्यानंतरही ठेवी परत मिळत नसल्याने ▸▸ पान २ वर

Email.- dailydivyawarta@Gmail.com

Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## छत्रपती मल्टीस्टेटच्या चेअरमनला शोधण्यास पोलिसांची दोन पथके




गेवराई (जि. बीड) :तालुक्यातील खळेगाव येथील ४६ वर्षीय शेतकरी सुरेश आत्माराम जाधव (रा. खळेगाव) यांनी छत्रपती मल्टिस्टेटमध्ये ठेवलेल्या ठेवी मिळत नसल्याने बुधवारी पहाटे मल्टिस्टेटसमोरच गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी चेअरमन संतोष बसंता भंडारी याच्या शोधार्थ गेवराई पोलिसांनी दोन पथके रवाना केली आहेत.

संतोष भंडारी आरोपी सुरेश जाधव यांनी छत्रपती मल्टिस्टेटमध्ये ९ लाख रुपयांच्या ठेवी ठेवलेल्या होत्या. त्या वारंवार मागूनही मिळत मिळत नव्हत्या. मुलांच्या शिक्षणासाठी जाधव यांना पैसे हवे होते. परंतु, वेळेत पैसे न मिळाल्याने त्यांच्या मुलीला शिक्षण सोडावे लागले होते. मंगळवारी ते पत्नी आणि मुलासह दिवसभर मल्टिस्टेटच्या कार्यालयात होते. अखेर ▸▸ पान २ वर

## मल्टीस्टेटवाल्यांनो आणखी किती बळी घेणार?

बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यात मागील दोन वर्षांपासून मल्टीस्टेटवाल्यांचा बाजार उठला आहे. लोकांना जास्त व्याजदराचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांच्या ठेवी घेतल्या. याच ठेवींवर अध्यक्षांसह संचालक मंडळाने मौजमजा केली. जेव्हा लोकांनी ठेवी परत मागितल्या त्यावेळी त्यांनी पळ काढला. बीडमध्ये अशी एक-दोन नव्हे, तर डझनभर उदाहरणे आहेत. अशातच गेवराई येथील छत्रपती मल्टीस्टेटमध्ये ठेवलेले कष्टाचे पैसे न मिळाल्याने सामान्य शेतकरी असलेल्या ठेवीदाराने मल्टीस्टेटच्या दारातच गळफास घेतला.




मल्टीस्टेटवाले आणखी किती बळी घेणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. शासन, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी ठेवीदारांमधून केली जात आहे. जिल्ह्यात ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, माँ साहेब जिजाऊ या मोठ्या मल्टीस्टेटमध्ये लोकांनी कोट्यवधी रुपयांच्या कष्टाच्या ठेवी ठेवल्या. काहींनी ▸▸ पान २ वर

### हे चार लोक निघाले 'फ्रॉड'

लोकांनी विश्वासाने ठेवी ठेवल्या. परंतु, ज्ञानराधाचा अध्यक्ष सुरेश कुटे, राजस्थानीचा चंदुलाल बियाणी, साईरामचा शाहिनाथ परभणे, माँ साहेब जिजाऊचा बबन शिंदे हे मोठे चार लोक सर्वांत जास्त 'फ्रॉड' निघाल्याचा आरोप ठेवीदार करीत आहेत. यांच्याशिवाय लक्ष्मीमाता अर्बन, महात्मा फुले नागरी बँक, मुक्ताई, गंगाभारती या मल्टीस्टेटवाल्यांनीही फसवणूक केलेली आहे.

### 'ज्ञानराधा' तपास सीआयडीकडे

ज्ञानराधा मल्टीस्टेटचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून काढून घेत तो आता सीआयडीकडे देण्यात आला आहे. याचा अध्यक्ष सुरेश कुटे हा कारागृहात आहे. त्याची पत्नी अर्चना कुटेसह इतर आरोपी अजूनही फरार आहेत. पोलिस अधीक्षक कार्यालयात आणून अर्चना कुटेला पोलिसांनी सोडले होते. तेव्हा तिच्यावर सात गुन्हे दाखल होते. त्यामुळे पोलिसांच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केला होता.

## जिल्हा परिषदेचे शिक्षक इमरान खान यांचे निधन

बीड , (दिव्य न्युज):- येथील सागर ट्रॅव्हल्सचे इकराम खान आणि बालरोग तज्ञ डॉ.इलियास खान



यांचे बंधू इमरान खान यांचे आज पहाटे ५ वाजता निधन झाले. गेवराई तालुक्यातील आहेर वाहेगाव येथील जिल्हा परिषद शाळेवर ते सहशिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. बीड येथील इमरान खान अब्दुल समद खान हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. आज पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास त्यांचे निधन झाले. त्यांचा दफनविधी हत्तीखाना भागातील शाह शमशोद्दीन कब्रस्तान येथे आज दुपारी २ वाजण्याच्या सुमारास करण्यात आला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, तीन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. खान कुटूंबियांच्या दु:खात सायं. दै.दिव्य वार्ता, कश्मकश परिवार सहभागी आहे.

## नाळवंडीसह आठ गावांच्या रोहयोच्या कामात बोगसगिरी

### तपासणीसाठी आयुक्तांनी पथक पाठवले

बीड , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायतींअंतर्गत रोहयो योजनेची कामे केली जातात. यामध्ये काही ठिकाणी बोगसगिरी हाते आहे. बीड तालुक्यातील नाळवंडीसह आठ गावांतील कामात भ्रष्टाचार झाला असून या प्रकरणाची चौकशी रोहयोच्या नागपूर आयुक्तालयाकडे करण्यात आली होती. आयुक्तांनी तक्रारीची दखल घेत कामांची तपासणीसाठी पथक पाठवले आहे. हे पथक आज दाखल झाले आहे. कामांची पाहणी करणार आहे.

नाळवंडी, घोडका राजुरी, म्हाळसजवळा, रुद्रापूर, हिवरापहाडी, अव्वलपूर, पोखरी मैंदा, बोरफळी या आठ गावांमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध कामे झालेले आहेत. या कामात बोगसपणा आणि अनियमितता असल्याची तक्रार नागपूर आयुक्तालयाकडे करण्यात आली होती. आयुक्तांनी तक्रारीची दखल घेत कामाच्या चौकशीसाठी पथक पाठविले आहे. हे पथक आज बीड येथे दाखल झाले असून कामाची चौकशी करणार आहेत. हजेरी पत्रके, रजिस्टर कामाची नोंदवही, ▸▸ पान २ वर

## शिंदेंचे मंत्री भरत गोगावले यांच्या व्हायरल व्हिडिओमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ!

मुंबई , (दिव्य न्युज):- रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांचा आणखी एक नवा व्हिडिओ समोर आला आहे. विशेष म्हणजे महायुतीतील घटक पक्ष राष्ट्रवादीचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनीच हा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये भरत गोगावले मांत्रिकासोबत दिसत आहेत. या व्हिडिओद्वारे सूरज चव्हाण यांनी गोगावलेंवर अघोरी पूजेचा आरोप केला आहे. या व्हिडिओमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

रोहयो मंत्री भरत गोगावलेंवर आणखी




एक व्हिडिओ बॉम्ब टाकण्यात आला आहे. विशेष म्हणजे याआधी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ▸▸ पान २ वर

## समीर मुजावर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- बीड येथून आंबेजोगाई शहर पोलीस स्टेशनला बदली होऊन आलेले समीर मुजावर यांचे आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत



यांनी जिल्ह्यातील पोलिसांची मलिन झालेली प्रतिमा सुधारण्याच्या उद्देशाने मागील महिन्यात २६ मे रोजी जिल्ह्यातील ६०३ पोलीस कर्मचाऱ्यांच्या एकाच वेळी ते कार्यरत आसलेल्या तालुक्याच्या बाहेर बदल्या करुन पोलीस खात्या मध्ये बॉम्ब उडवून दिला.

या बदलीने असंख्य पोलीस कर्मचारी नाराज होते. या नाराजी नाट्ट्या मधून काही कर्मचाऱ्यांनी मॅट कोर्टात धाव घेतली आहे. अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनलाही २६ पोलीस कर्मचारी बदली होऊन आलेले असून या पैकी बार्शी येथील रहिवासी असलेले समीर मुजावर (वय ४२) हे ही एक होते. मुजावर हे बार्शीचे राहिवासी असल्याने त्यांचा स्व जिल्ह्यात म्हणजे सोलापूर जिल्ह्यात बदली साठी प्रयत्न सुरु होता. मागील २ दिवस ते पोलीस स्टेशनच्या कामासाठीच मंबईला गेले होते आणि रात्रीच परत अंबाजोगाईला आले होते. आज आपल्या अन्य सहकाऱ्या सोबत चनई रोडवरील किरायाने घेतलेल्या रूममध्ये मुजावर असतानाच त्यांना हृदयविकाराच्या तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे दुःखद निधन झाले. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात सध्या त्यांच्या शवविच्छेदची प्रक्रिया सुरु असून त्यांच्या पश्चात पत्नी २ मूले व अन्य परिवार आहे. मुजावर यांच्या दुःखद निधना मूळे पोलीस वर्तुळात हळहळ व्यक्त होतं आहे.

## मिसाईलचा वार पलटवार सुरुच

### इराणकडून इस्त्रायली न्यूज चॅनेल टार्गेट, थेट आयटी हब असलेल्या शहरातही इराणी बॅलेस्टीक मिसाईलचा आगडोंब



दिल्ली, (वृत्तसेवा):- आज इराण आणि इस्रायलमधील युद्धाचा आठवा दिवस आहे. गुरुवारी इस्रायलने इराणच्या खोंडूब अणुभट्टीवर हल्ला केला. याच्या काही तास आधी इस्रायलने अरक अणुभट्टीवरही हल्ला केला होता. या दोन्ही ठिकाणी जड पाण्याचे (हेवी वॉटर) अणुभट्टी आहेत, ज्याचा वापर प्लुटोनियम बनवण्यासाठी केला जातो. हल्ल्याच्या काही काळापूर्वी इस्रायलने हे क्षेत्र रिकामे करण्याचा इशारा दिला होता. गुरुवारी रात्री उशिरा इस्रायली लढाऊ विमानांनी इस्रायली राजधानी तेहरानवर हवाई हल्लाही केला. त्यानंतर हवाई संरक्षण यंत्रणा सक्रिय करण्यात आली. त्याच वेळी, इराणने इस्रायलच्या 'चॅनेल-१४' कार्यालयावर हल्ला करण्याची धमकी दिली आहे, त्याला पंतप्रधान नेतन्याहू यांचे मुखपत्र म्हटले आहे. आतापर्यंत ७ दिवस चाललेल्या युद्धात २४ इस्रायली लोक मारले गेले आहेत, तर ६०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. त्याच वेळी, वॉशिंग्टनस्थित एका मानवाधिकार गटाने दावा केला आहे की इराणमध्ये मृतांची संख्या आता ६३९ वर पोहोचली आहे आणि १३२९ लोक जखमी आहेत.

**इराणने सलग दुसऱ्या दिवशी बेरशेबा येथे हल्ला केला**

इराणी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांनी आयटी हब असलेल्या बेरशेबा शहरात बरेच नुकसान केले आहे. टाईम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, इराणचे एक क्षेपणास्त्र एका अपार्टमेंट ब्लॉकच्या बाहेर पडले, ज्यामुळे अनेक गाड्या जळाल्या. जवळील घरांचेही नुकसान झाले. सध्या, कोणीही जखमी झाल्याची तत्काळ माहिती नाही. इराणने काल बेरशेबा येथील एका रुग्णालयावरही क्षेपणास्त्र हल्ला केला. यामध्ये ५० हून अधिक लोक जखमी झाले.

इस्रायली सैन्याच्या म्हणण्यानुसार, इराणने आतापर्यंत इस्रायलवर ४५० क्षेपणास्त्रे आणि एक हजाराहून अधिक ड्रोन डागले आहेत. बहुतेक ड्रोन इराणमधून ▸▸ पान २ वर









# ६४ पानी अहवाल, वर्मांच्या नियंत्रणातील खोलीत रोकड

# न्या.वर्मांच्या खासगी स्टाफने सकाळी हटवली जळालेली कॅश ;अहवाल

## रोकडचा उल्लेख करू नये, स्वीय सचिवाची अग्निशमला सूचना

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):– न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी १४ मार्च रोजी लागलेल्या आगीत रोख रक्कम जळून खाक झाल्याच्या घटनेत अनेक धक्कादायक तपशील उजेडात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या तीनसदस्यीय चौकशी समितीने ४२ दिवसांच्या चौकशीनंतर ६४ पानांचा अहवाल तयार केला. तो ४ मे रोजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना सादर करण्यात आला. अलीकडेच हा अहवाल जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार स्टोअर रूममधून मोठ्या प्रमाणात



जळालेली व अर्धवट जळालेली रोकड सापडली. ही स्टोअर रूम न्यायमूर्ती वर्मा आणि त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यात होती. अहवालानुसार १५ तारखेच्या सकाळी ही रोकड काढून टाकण्यात आली. या रोख रकमेबाबत न्यायमूर्ती वर्मा कोणतेही समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. समितीने न्यायमूर्ती वर्मा यांना काढून टाकण्यासाठी कार्यवाही सुरू करण्याची शिफारस अहवालात केल्याचे सूतोवाच केले. अहवालानुसार स्टोअर रूम न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासी संकुलात होती आणि त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे त्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नियंत्रण होते. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सांगितले की परवानगीशिवाय कोणीही तेथे पोहोचू शकत नाही. १५ तारखेला सकाळी अग्निशमन दल, पोलिस निघून गेल्यानंतर जळालेली रोकड काढून टाकल्याचे समितीला आढळून आले. यामध्ये न्यायमूर्ती वर्मा यांचे वैयक्तिक सचिव राजिंदर सिंग कार्की आणि घरगुती कर्मचाऱ्यांमधील दोन सदस्यांची (राहिल, हनुमान प्रसाद शर्मा) भूमिका संशयास्पद आढळली. कार्की यांनी अग्निशमन दलाला अहवालात रोख रकमेचा उल्लेख करू नये असे सांगितले होते.

## ५५ साक्षीदारांचे जबाब... यात जळालेल्या रोख रकमेचा ढीग पाहणाऱ्यांचाही समावेश

तपास समितीने एकूण ५५ साक्षीदारांचे जबाब नोंदवले. यामध्ये दिल्ली अग्निशमन सेवेतील ११, दिल्ली पोलिसांचे १४, सीआरपीएफचे ६, न्यायमूर्ती वर्मा यांच्या घरगुती आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांमधील १८ जण, न्यायमूर्ती वर्मा आणि त्यांची मुलगी इत्यादींचा समावेश आहे.

**साक्षीदार क्रमांक ३ : अंकित सेहवाग, अग्निशमन अधिकारी,**

दिल्ली अग्निशमन सेवा : मला प्रदीपकुमार आणि परविंदर मलिक (अग्निशमन केंद्र कर्मचारी) यांनी सांगितले की स्टोअर रूममध्ये आग लागली होती आणि तेथे चलनी नोटा जळत आहेत. मी जाऊन टॉर्चच्या प्रकाशात स्वतः ते पाहिले. ५०० रुपयांच्या अनेक नोटा अर्ध्या जळाल्या होत्या. पाणी शिंपडल्याने नोटा ओल्या झाल्या होत्या आणि आगीमुळे काही भाग जळाला होता. परंतु हे स्पष्टपणे दिसत होते की या ५०० रुपयांच्या नोटा आहेत. (२३ मार्च रोजी नोंदवलेले निवेदन) सीआरपीएफ आणि सुरक्षा कर्मचारीः म्हणाले, स्टोअर रूमचा दरवाजा नेहमीच बंद असे. परवानगीशिवाय कोणताही बाहेरील व्यक्ती आत येऊ शकत नव्हता. काहींनी दरवाजा तोडण्यास मदत केली होती.

न्यायमूर्ती वर्मा यांचे घरगुती आणि न्यायालयीन कर्मचारी : यापैकी काही कर्मचाऱ्यांनी (राहिल, हनुमान प्रसाद शर्मा, राजिंदर सिंग कार्की सारखे) सांगितले की स्टोअर. रूम सहसा बंद राहत असे. परंतु चाव्या अनेक लोकांकडे असतात. काहींनी कोणतीही रोकड पाहिल्याचे नाकारले. समितीने असा निष्कर्ष काढला की राहिल, हनुमान प्रसाद आणि राजिंदर यांनी १५ मार्च रोजी सकाळी रोख रक्कम काढली. दीया वर्मा (न्या. वर्मा यांची मुलगी): म्हणाल्या, मला आणि कर्मचाऱ्यांना स्टोअर रूममध्ये कोणतीही रोकड दिसली नाही. न्यायमूर्ती यशवंत वर्माः म्हणाले, स्टोअर रूम सर्वांसाठी खुले होते. त्यांच्या किंवा त्यांच्या कुटुंबाची कोणतीही रोकड तेथे नव्हती. कट रचल्याचा आरोप केला. परंतु कोणताही पुरावा किंवा नाव दिले नाही.

पान १ वरून

### आमिषाने ठेवी

पंढरी किसन केकान (रा.चाटगाव ता.धारूर) या ठेवीदाराने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार स्वत:च्या फायद्यासाठी ठेवीच्या रकमेचा अपहार करून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी बँकेचे अध्यक्ष शिवहरी अशोक यादव, उपाध्यक्ष सचिन पांडुरंग रोडगे, सचिव रामेश्वर धर्मराज तांदळे (सर्व रा.माजलगाव), माजलगाव मुख्य शाखा प्रमुख पाडुरंग सुदाम तांदळे आणि दिंद्रुडचे शाखाधिकारी ज्ञानेश्वर सुदाम यादव (रा.धुनकवड ता.धारूर) या पाच जणांविरूध्द कलम ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०, ३१६ (५), ३(५) बीएनएससह कलम ३, ४ एमपीआयडी प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सपोनि ढाकणे करीत आहेत.

### छत्रपती मल्टीस्टेटच्या

रात्री त्यांची पत्नी कार्यालयातच झोपल्या. तर मुलाला घेऊन जाधव घरी गेले. परंतु, बुधवारी पहाटे परत येऊन त्यांनी मल्टिस्टेटसमोरच गळफास घेतला. सकाळी ठेवीदारांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, मल्टिस्टेट उघडलीच नाही. बँकेचे सर्व कर्मचारी फरार झाले आहेत. या प्रकरणी मयत जाधव यांची पत्नी कविता यांच्या फिर्यादीवरून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी चेअरमन संतोष बसंता भंडारीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गेवराई पोलिस फरार भंडारीचा शोध घेत आहे. दरम्यान, मयत ठेवीदार सुरेश जाधव यांच्यावर मूळगावी खळेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### मल्टीस्टेटवाल्यांनो आणखी

मुलांचे शिक्षण तर काहींनी मुला-मुलींच्या लग्नाचे नियोजन म्हणून हे पैसे मल्टीस्टेटमध्ये ठेवले. परंतु, या चारही मल्टीस्टेटच्या अध्यक्षांनी या पैशांचा गैरवापर करून तो दुसरीकडेच गुंतवला. त्याचे नियोजन केले नाही. त्यामुळे ठेवीदारांनी पैसे परत मागितल्यावर त्यांना देता आले नाहीत. सुरुवातीला काही दिवस लोकांनी अध्यक्षांचे ऐकले; पण नंतर त्यांचा विश्वास उडाला. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेण्यास टाळाटाळ केल्याने न्यायालयात धाव घेत आदेश आणले. त्यानंतर गुन्हे दाखल झाले. हे अजूनही अखंडितपणे सुरूच आहे. गुन्हे दाखल होत असले तरी पैसे मिळण्याच्या आशा धूसर होत चालल्या आहेत. आमचे कष्टाचे पैसे परत कधी मिळतील, या आशेने ठेवीदार आला दिवस काढत आहेत.

गेवराईतील छत्रपती मल्टीस्टेटच्या दारात सुरेश जाधव या शेतकऱ्याने ठेवी न दिल्याने गळफास घेतला. दोन दिवसांपूर्वीच या मल्टीस्टेटवर गुन्हा दाखलचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. परंतु, अद्यापही त्यात गुन्हा दाखल झाला नसल्याचे सांगण्यात आले. परंतु, आत्महत्यास जबाबदार धरून अध्यक्ष संतोष भंडारी याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

### नाळवंडीसह आठ

मोजमाप पुस्तिका, कुशल देयके, जिओ टॅगिंगचे फोटो, सिमेंट रस्ता, पेवर ब्लॉक, कामाची गुणवत्ता यासह अन्य बाबींची पथकाचे कर्मचारी पाहणी करणार आहेत. कामाची पाहणी करण्यासाठी पथक येताच संबंधितांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत. पथकामध्ये गणेश आदमनकर, श्रीमती वैशाली कुलकर्णी, उद्धव होळकर, जितेंद्र चौधरी या कर्मचार्यांचा समावेश आहे.

### शिंदेंचे मंत्री भरत

पक्षाचे वसंत मोरे यांनी व्हिडिओ बॉम्ब टाकला होता. त्यानंतर आता मित्रपक्ष राष्ट्रवादीचे सूरज चव्हाण यांनी नवा व्हिडिओ टाकून गोगावलेंना धक्का दिला. या व्हिडिओबाबत भरत गोगवले यांनी प्रतिक्रिया दिली. अघोरी पूजेचे सर्व आरोप भर गोगवले यांनी फेटाळले आहेत. अशा प्रकारची कोणतीही पूजा केली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. घरी अनेक सांधू संत भेटायला येतात. त्यावेळचा हा व्हिडिओ असल्याचा दावा भरत गोगवले यांनी केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते वसंत मोरेंनी गोगावलेंचा एक व्हिडिओ समोर आणला होता. या व्हिडिओत भरत गोगावले बगलामुखी यज्ञ करत असल्याचा दावा मोरेंनी केला होता. राजकीय विरोधकांवर मात करण्यासाठी उज्जैनच्या पुजा-यांना बोलावून हा यज्ञ केल्याचा आरोप वसंत मोरेंनी केला होता.

दरम्यान, मात्र ठाकरेंच्या शिवसेनेच्या अघोरी पूजेच्या आरोपाचं बुमरँग झाल्याचं पाहायला मिळतंय. या वादात मंत्री नितेश राणेंनी उडी घेतलीय... अघोरी पूजा काय असते हे मातोश्रीच्या तिसऱ्या मजल्यावर विचारा असं म्हणत नितेश राणेंनी जोरदार पलटवार केलीय. तर अघोरीपूजेत उद्धव ठाकरे तज्ज्ञ असल्याचं म्हणत नितेश राणेंनी ठाकरेंवर निशाणा साधलाय.

# मिसाईलचा वार पलटवार सुरुच

डागले गेले होते, तर काही प्रॉक्सी तळांवरून डागले गेले होते. त्याच वेळी, सैन्याच्या म्हणण्यानुसार, इस्रायलने प्रथम पश्चिम इराणमध्ये कारवाई सुरू केली आणि आता पूर्वेकडील भागात हल्ला करत आहे.इराणने पुन्हा एकदा इस्रायलवर अनेक क्षेपणास्त्रे डागली आहेत. इस्रायली सैन्याने सांगितले की त्यांना याची जाणीव आहे. येणाऱ्या क्षेपणास्त्रांचा मागोवा घेण्यासाठी आणि त्यांना रोखण्यासाठी संरक्षण यंत्रणा काम करत आहे. सध्या तरी इस्रायली जनतेला सुरक्षित ठिकाणी जाण्याचा इशारा देण्यात आला आहे.इस्रायलसाठी हेरगिरी केल्याबद्दल इराणमध्ये २४ जणांना अटक करण्यात आली आहे. इराणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सर्व लोक ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही ठिकाणी इस्रायलसाठी काम करत होते. या सर्व आरोपींवर इराणी सरकारची प्रतिमा खराब केल्याचा आरोप आहे.

इराण-इस्रायल युद्ध थांबवण्याचा प्रयत्न करणारे ३ युरोपीय देश

अल जझीरा नुसार, या बैठकीत इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराक्ची यांच्यासह ३ युरोपीय देशांचे परराष्ट्र मंत्री सहभागी होतील. त्यात ब्रिटनचे परराष्ट्र सचिव डेव्हिड लॅमी, फ्रान्सचे परराष्ट्र मंत्री जीन-नोएल बॅरोट आणि जर्मनीचे परराष्ट्र मंत्री जोहान वाडेफुल यांचा समावेश असेल. याशिवाय युरोपियन युनियनचे परराष्ट्र धोरण प्रमुख काजा कल्लास देखील बैठकीत सहभागी होतील. या संभाषणाचे कारण म्हणजे जगाला भीती आहे की अमेरिका आणि इस्रायल एकत्रितपणे इराणवर हल्ला करू शकतात. ही चिंता लक्षात घेऊन, युरोपातील देश काही प्रमाणात तणाव कमी करू इच्छितात आणि हा विषय शांततेने सोडवू इच्छितात. फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन आणि युरोपियन युनियनने आधीच इराणसोबत एक महत्त्वाचा अणु करार केला आहे. हा करार २०१५ मध्ये झाला होता, ज्यामध्ये इराणने आश्वासन दिले होते की तो आपला अणुकार्यक्रम मर्यादित करेल. त्या बदल्यात त्याच्यावर लादलेले आंतरराष्ट्रीय निर्बंध उठवले जातील.पण २०१८ मध्ये तत्कालीन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा करार मोडला आणि अमेरिकेला त्यातून बाहेर काढले. तेव्हापासून इराण आणि पाश्चात्य देशांमधील संबंध आणखी बिघडले आहेत. आता युरोपीय देश पुन्हा चर्चेद्वारे तोडगा काढण्याचा प्रयत्न करत आहेत.





## इराणने घेतला अणू शास्त्रज्ञांचा मृत्यूचा बदला, चार दिवसानंतर समोर आला रिपोर्ट

दिल्ली, (वृत्तसेवा):- इराण आणि इस्रायलमध्ये संघर्ष सुरु आहे. १३ जून रोजी इस्रायलने इराणवर हल्ला केला. या हल्ल्यात इस्रायलने इराणमधील महत्वाच्या लोकांना लक्ष्य केले. त्यात इराणचे सैन्य दल प्रमुख, कमांडर आणि अणू शास्त्रज्ञ यांचा मृत्यू झाला. त्यामुळे इराणला मोठा धक्का बसला. परंतु आता चार दिवसानंतर महत्वाचा रिपोर्ट समोर आला आहे. इराणने अणू शास्त्रज्ञांचा मृत्यूचा बदला घेतला आहे.

रविवारी पहाटे इराणी क्षेपणास्त्रांनी इस्रायलच्या महत्वाच्या केंद्रावर हल्ला केला. इस्रायलच्या वैज्ञानिक शक्तीचा पाया रचलेल्या ठिकाणीच हल्ला केला. इराणने इस्रायलच्या वेझमन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सला लक्ष्य केले. जे इस्रायलच्या वैज्ञानिक प्रतिष्ठेचे आणि तांत्रिक ओळखीचे प्रतीक मानले जाते. वेझमन इन्स्टिट्यूट येथेच इस्रायलचा पहिला संगणक विकसित झाला होता. इस्रायलचे आधुनिक संशोधन केंद्र म्हणून वेझमन इन्स्टिट्यूची ओळख आहे. त्यामुळे त्या ठिकाणी इराणकडून झालेला हल्ला केवळ लष्करी हल्ला नव्हता तर एक गंभीर प्रतीकात्मक हल्ला होता. इराणाने त्या माध्यमातून कोठर संदेश दिला. तुम्ही आमच्या शास्त्रज्ञांना मारले तर आम्ही तुमच्या ज्ञानाचे केंद्रच उद्धस्त केले.

**अनेक वर्षांची मेहनत गेली**

इराणच्या हल्ल्यात वेझमन इन्स्टिट्यूटच्या दोन इमारती पूर्णपणे नष्ट झाल्या. त्यात एक बायोलॉजिकल सायन्स लॅब होती. दुसऱ्या इमारतीचे काम सुरु होते. जवळपास असणाऱ्या इतर इमारतींचे मोठे नुकसान झाले आहे. खिडक्या तुटल्या आहेत. हाय टेक रिसर्च उपकरणांची राख झाली आहे. या हल्ल्यात कोणतीही जीवीत हानी झाली नाही. परंतु अनेक वर्षांची मेहनत वाया गेल्याचे शास्त्रज्ञांकडून सांगितले गेले. या प्रयोगशाळा पुन्हा सुरु करण्यासाठी अनेक वर्ष लागतील, असेही शास्त्रज्ञांनी म्हटले.वेझमन इन्स्टिट्यूटचा लक्ष्य करण्यामागे इराणचा विशिष्ट उद्देश होता. वेझमन इन्स्टिट्यूटचा संबंध सरळ संरक्षण उद्योगांसोबत होता. या ठिकाणी झालेले संशोधन संरक्षण कंपन्यांना दिले जात होते. त्यामुळे ही संस्था केवळ वैज्ञानिक नाही तर सुरक्षेच्या मोर्चावरसुद्धा महत्वाची होती. त्याच ठिकाणी हल्ला करुन इस्रायलला मोठा धक्का इराणने दिला आहे.

## इराणवर हल्ला करण्याचा विचारही करू नका, रशियाचा अमेरिकेला इशारा

दिल्ली, (वृत्तसेवा):- गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला इराण-इस्रायल यांच्यातील लष्करी संघर्ष आता आणखी तीव्र होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड यांनी इराणवर हल्ला करण्याचे संकेत दिले होते. यावर आता रशियाने अमेरिकेला कडक इशारा दिला असून, इराणविरुद्धच्या लष्करी कारवाईत इस्रायलला पाठिंबा देऊ नये, असे सांगितले आहे.

रशियाचे उपपरराष्ट्र मंत्री सर्गेई रियाबकोव्ह नुकतेच म्हणाले की, जर अमेरिकेने इस्रायलला थेट लष्करी मदत दिली, तर मध्य पूर्वेतील परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. अशा मदतीचा विचार करणेही धोकादायक ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.हे असे पाऊल असेल, जे संपूर्ण परिस्थिती पूर्णपणे अस्थिर करेल, असे रियाबकोव्ह यांनी रशियन वृत्तसंस्था इंटरफॅक्सला सांगितले. यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, रशिया आणि अमेरिका संपर्कात असून, इराण-इस्रायल संघर्षाबाबत चर्चा सुरू आहे.गेल्या शुक्रवारीपासून, इस्रायलने इराणच्या अणुस्थळांवर तसेच काही शास्त्रज्ञ आणि वरिष्ठ लष्करी नेत्यांवर हवाई हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, रशियाने या हल्ल्यांना सुरुवातीपासूनच विरोध केला आहे.

प्रत्युत्तरादाखल, इराणनेही गेल्या काही दिवसांपासून इस्रायली शहरांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले आहेत. यामुळे या प्रदेशात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. दोन्ही देश एकमेकांवर सातत्याने हल्ले करत आहेत.रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने असा इशाराही दिला आहे की, इस्रायलकडून इराणच्या अणु प्रकल्पांवर होत असलेल्या हल्ल्यांमुळे हा प्रदेश आपत्तीच्या अगदी जवळ आला आहे, आपत्तीपासून फक्त काही मिलिमीटर दूर.

**इराणमधील अणुप्रकल्पावरील हल्ले थांबवण्याचे रशियाचे इस्रायलला आवाहन**

इस्रायलने इराणमधील बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पावर केलेले हवाई हल्ले तात्काळ थांबवावेत, असे आवाहन रशियाच्या परराष्ट्र खात्याने केले आहे. या प्रकल्पात रशियन तज्ज्ञ कार्यरत आहेत.बुशेहर हा इराणमधील एकमेव कार्यरत अणुऊर्जा प्रकल्प आहे. या ठिकाणी रशियन इंधन वापरण्यात येते. अण्वस्त्र प्रसाराचा धोका टाळण्यासाठी वापरानंतर रशिया इंधन परत घेते.इस्रायल इराण संघर्षात अमेरिकेने उडी घेऊ नये असे रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोव्हा यांनी म्हटले आहे. तसे झाल्यास गंभीर परिणाम होतील असा धमकीवजा इशाराही रशियानं दिला आहे.